नशामुक्त भारत अभियान (NMBA)" व "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR)" प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सुकाणू, समन्वय व देखरेख समित्या स्थापन करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः डीडीपी-२०२६/प्र.क्र.१४८/सामासु

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- १ सप्टेंबर, २०२६.

**वाचा:-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, यांचे अर्धशासकीय पत्र क्र. DP-९/१/२०२१- DP-१, दिनांक २४ जून, २०२६.

**प्रस्तावना :-**

अंमली पदार्थांच्या व्यसनाचे प्रमाण हे सार्वजनिक आरोग्य, सामाजिक स्थैर्य, उत्पादकता आणि सर्वांगीण विकासासाठी गंभीर आव्हान ठरत आहे. या समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी सामाजिक न्याय व अधिकारिता विभागामार्फत "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR)" तसेच "नशा मुक्त भारत अभियान (NMBA)" राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रतिबंध, जनजागृती, उपचार आणि पुनर्वसन या सर्व बाबींचा समावेश आहे.

मा.केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे NCORD ची ९ वी सर्वोच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR)" तसेच "नशा मुक्त भारत अभियान (NMBA)" च्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने भारत सरकार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिनांक २४ जून २०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यात अंमली पदार्थांच्या सेवनावर प्रतिबंध घालण्यासाठी सन २०२६-२९ या कालावधीसाठी त्रैवार्षिक कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर त्रिस्तरीय समित्या स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

मा. केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ०९ जानेवारी, २०२६ रोजी नवी दिल्ली येथे नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर (NCORD) ची ९ वी सर्वोच्च स्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR)" तसेच "नशा मुक्त भारत अभियान (NMBA)" यांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. सदर बैठकीत अंमली पदार्थांच्या सेवनावर प्रतिबंध घालण्यासाठी "नशामुक्त भारत" हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी त्रैवार्षिक कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सामाजिक न्याय व अधिकारिता विभागाने (DoSJE)

वार्षिक उद्दिष्टांसह कृती आराखडा तयार केला असून या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, सातत्यपूर्ण देखरेख, विभागीय समन्वय आणि सर्व प्रशासकीय स्तरांवर नियमित आढावा घेणे आवश्यक आहे.त्याअनुषंगाने, राज्य स्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरीय (ब्लॉक स्तर) समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**राज्यस्तरीय सुकाणू व देखरेख समिती** :-

नशामुक्त भारत अभियांनातंर्गत त्रैमासिक कृती आराखड्याचे प्रभावी अंमलबजावणीसाठी मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू व देखरेख समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समिती सदस्य |
|---|---|---|
| १. | मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य. | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव, गृह विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १०. | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ११. | आयुक्त, समाजकल्याण, पुणे | सदस्य सचिव |

**समितीची प्रमुख कार्य** (Terms of Reference):-

**अ) अंमली पदार्थ मागणी कमीकरणाचे धोरणात्मक पर्यवेक्षण:-**

मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR) आणि नशा मुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत राज्य कृती आराखड्याच्या अंमलबजावणीवर एकूण देखरेख ठेवणे. जनजागृती, उपचार, पुनर्वसन, समुपदेशन, क्षमता विकास तसेच अंमली पदार्थांच्या सेवनावर प्रतिबंध घालण्यासाठी संबंधित इतर बाबींमध्ये वार्षिक व त्रैमासिक उद्दिष्टांची राज्य/केंद्रशासित प्रदेशात प्रभावी पूर्तता सुनिश्चित करणे.

**ब) आंतर-विभागीय समन्वय:-**

१. सामाजिक कल्याण, आरोग्य, गृह, युवक कार्य, महिला व बाल विकास, उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण, कौशल्य विकास, पंचायत राज, ग्रामीण विकास, माहिती व जनसंपर्क, स्थानिक स्वयंसेवी संस्था (NGOs/CSOs) तसेच इतर संबंधित विभागांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे.

२. अंमली पदार्थ मागणी कमीकरणाशी संबंधित उपक्रमांचा विद्यमान राज्य/केंद्रशासित प्रदेशातील योजना व कार्यक्रमांमध्ये समावेश सुनिश्चित करणे.

**क) प्रतिबंधात्मक व जनजागृती उपक्रमांचे निरीक्षण:-**

१. शैक्षणिक संस्था, गावे, ग्रामपंचायती, प्रभाग (वार्ड), संवेदनशील समुदाय इत्यादी ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमांचा आढावा घेणे.

२. नशा मुक्त भारत अभियान (NMBA) च्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे तसेच व्यसन प्रतिबंधाशी संबंधित राष्ट्रीय कार्यक्रमांचे प्रभावी आयोजन करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोच सुनिश्चित करणे.

३. युवक मंडळे, MY Bharat Volunteers, स्वयंसेवी संस्था (NGOs), आध्यात्मिक संस्था तसेच इतर संबंधित संस्था/मंडळे/गट यांचा नशा मुक्ती मित्र (Nasha Mukti Mitr - NMM) म्हणून सक्रिय सहभाग वाढविणे.

**ड) उपचार व पुनर्वसन सेवा** (Treatment and Rehabilitation Services):-

१. व्यसनाधीन व्यक्तींसाठी एकात्मिक पुनर्वसन केंद्रे (IRCAs), जिल्हा व्यसनमुक्ती केंद्रे (DDACs), व्यसन उपचार सुविधा (ATF) तसेच इतर उपचार केंद्रांची उपलब्धता व कार्यप्रणालीचा आढावा घेणे.

२. उपचारासाठी दाखल झालेल्या लाभार्थ्यांची संख्या, उपचारानंतरची पुनर्प्राप्ती (Recovery), पुनर्व्यसन (Relapse) प्रतिबंधक उपाययोजना तसेच संदर्भ (Referral) यंत्रणेचे परीक्षण करणे.

३. उपचार सेवांच्या उपलब्धता व गुणवत्तेमधील त्रुटी ओळखून त्या दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

**इ) उच्च-जोखीम जिल्ह्यांवर देखरेख** (Monitoring of High-Burden Districts):-

१. उच्च-जोखीम जिल्हे ओळखून त्यांच्यासाठी लक्ष केंद्रीत हस्तक्षेप आराखड्यास मान्यता देणे.

२. नव्याने उदयास येणाऱ्या हॉटस्पॉट क्षेत्रांमध्ये विशेष मोहिमा राबविण्याचे निर्देश देणे.

**ई) क्षमता विकास** (Capacity Building):-

शिक्षक, समुपदेशक, आरोग्यसेवा व्यावसायिक, कायदा अंमलबजावणी यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी तसेच समुदाय स्वयंसेवक यांच्यासाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेणे.

**उ) कार्यप्रदर्शन आढावा व उत्तरदायित्व** (Performance Review and Accountability):-

१. निर्धारित कार्यप्रदर्शन निर्देशकांच्या आधारे जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेणे.

२. NMBA पोर्टलवर वेळेवर अहवाल सादर केले जातील याची खात्री करणे.

३. सातत्याने कमी कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांसाठी आवश्यक सुधारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देणे.

**ऊ) संसाधनांचे संकलन व प्रभावी वापर** (Resource Mobilization):-

१. प्रतिबंध, उपचार व पुनर्वसन उपक्रमांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या उपलब्ध निधी व संसाधनांचा प्रभावी व योग्य वापर सुनिश्चित करणे.

२. स्वयंसेवी संस्था (NGOs), शैक्षणिक संस्था आणि नागरी समाज संघटनांबरोबर भागीदारीस प्रोत्साहन देणे.

**ए)** बैठका:- त्रैमासिक (दर तीन महिन्याने)

जिल्हास्तरीय समिती :-

| अ.क्र. | पदनाम | समिती सदस्य |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | पोलीस अधीक्षक | सदस्य |
| ३. | जिल्हा शल्यचिकित्सक, | सदस्य |
| ४. | मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.), | सदस्य |
| ५. | महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| ६. | जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| ७. | सहायक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य सचिव |

सदर समितीच्या बैठकाचे आयोजन प्रत्येक महिन्याला (मासिक) आयोजित करण्यात यावे.

**समितीचे प्रमुख कार्य:-**

**अ) जिल्हास्तरीय अंमली पदार्थ मागणी कमी करण्याचे नियोजन:-**

१. राज्याच्या उद्दिष्टांशी सुसंगत जिल्हास्तरीय अंमली पदार्थ मागणी कमीकरण आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

२. जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या दृष्टीने असुरक्षित लोकसंख्या व भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील (हॉट स्पॉट) क्षेत्रांची ओळख पटविणे.

**ब) प्रतिबंध व जनजागृती:-**

१. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कार्यस्थळे व समुदाय स्तरावर जनजागृती कार्यक्रमांचे समन्वयन करणे.

२. विविध विभाग व भागीदार संस्थांच्या माध्यमातून नशा मुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत उपक्रम नियमितपणे राबविले जात असल्याची खात्री करणे.

**क) लवकर ओळख व संदर्भ सेवा (Early Identification and Referral):-**

१.शाळा, समुदाय, आरोग्य संस्था व उपचार केंद्रांमधील संदर्भ (Referral) यंत्रणा अधिक सक्षम करणे.

२. समुपदेशन व कुटुंब सहाय्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक समन्वय साधणे.

**ड) उपचार व पुनर्वसनाचे निरीक्षण:-**

१. DDACs, IRCAs, ATFs तसेच इतर उपचार सुविधांच्या कार्याचे नियमित निरीक्षण करणे.

२. उपचारासाठी दाखल झालेल्या लाभार्थ्यांची संख्या, उपचार पूर्णत्वाचे प्रमाण, उपचारोत्तर पाठपुरावा सेवा व पुनर्वसनाच्या परिणामांचा आढावा घेणे.

३. समुपदेशन, व्यसनमुक्ती (Detoxification) व पुनर्वसन सेवा उपलब्ध असल्याची खात्री करणे.

**इ) उपचार सुविधांची त्रैमासिक तपासणी:-**

१. सदर समितीमार्फत तपासणी तीन महिन्यात (त्रैमासिक) एक वेळा करण्यात यावी.

२. DDACs (District De-Addiction Centres) जिल्हास्तरीय व्यसनमुक्ती केंद्रे

३. IRCAs (Integrated Rehabilitation Centres for Addicts) व्यसनाधीन व्यक्तींसाठी एकात्मिक पुनर्वसन केंद्रे.
४. व्यसन उपचार सुविधा (Addiction Treatment Facilities - ATFs).
५. प्रतिबंधात्मक उपक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्था.
६. सेवा गुणवत्तेची, लाभार्थी नोंदींची व पायाभूत सुविधांच्या निकषांची पडताळणी करणे.

**ई) समुदाय-आधारित हस्तक्षेप (Community-Based Interventions):-**

गावे, प्रभाग (वॉर्ड) व शहरी वस्त्यांमध्ये जनजागृती व प्रतिबंधात्मक उपक्रमांना प्रोत्साहन देणे. पंचायत राज संस्था, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयं-सहाय्यता गट (Self-Help Groups) व श्रद्धा-आधारित संस्थांचा सहभाग वाढविणे.

**उ) माहिती संकलन व अहवाल सादरीकरण (Data Collection and Reporting):-**

१. जनसंपर्क (Outreach), उपचार व पुनर्वसनाशी संबंधित जिल्हास्तरीय माहितीची पडताळणी करणे.
२. NMBA पोर्टलद्वारे अहवाल वेळेत सादर केले जात असल्याची खात्री करणे.

**ऊ) नशा मुक्ती मित्र व स्वयंसेवकांचे पर्यवेक्षण (Monitoring of Nasha Mukti Mitras and Volunteers):-**

१. स्वयंसेवकांची नोंदणी (Onboarding), नियुक्ती (Deployment) व नियमित कार्याचा आढावा घेणे.
२. असुरक्षित समुदायांमध्ये नियमित जनसंपर्क (Outreach) उपक्रम राबविले जात असल्याची खात्री करणे.

**ए) व्यसनमुक्त झालेल्या व्यक्तींच्या कौशल्य विकासास प्रोत्साहन:-**

१. व्यसनमुक्त झालेल्या व्यक्तींच्या कौशल्य विकास व उपजीविकेसाठी कौशल्य विकास अभियान व संबंधित विभागांशी समन्वय साधणे.
२. जिल्ह्यात व्यसनमुक्त व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास व पुनर्वसन उपक्रमांच्या प्रगतीचा नियमित आढावा व निरीक्षण करणे.

**तालुकास्तरीय (ब्लॉक स्तर) समिती :-**

| अ.क्र. | पदनाम | समिती सदस्य |
|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| २ | तहसीलदार | सदस्य |
| ३ | पोलीस निरीक्षक | सदस्य |
| ४ | गट शिक्षणाधिकारी | सदस्य |
| ५ | बाल विकास प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ६ | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ७ | समाजकल्याण अधिकारी (वर्ग-२) | सदस्य सचिव |

सदर समितीच्या बैठकाचे आयोजन प्रत्येक महिन्याला (मासिक) आयोजित करण्यात यावे

**समितीची कार्यकक्षा:-**

**अ) NMBA उपक्रमांचे क्षेत्रस्तरीय निरीक्षण** (Field-Level Monitoring of NMBA Activities):-

१. गावे, प्रभाग (वॉर्ड), शाळा, महाविद्यालये व समुदायांमध्ये राबविण्यात येणाऱ्या जनजागृती व प्रतिबंधात्मक उपक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे.

२. जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली मासिक उद्दिष्टे निर्धारित वेळेत पूर्ण होत असल्याची खात्री करणे.

**ब) संवेदनशील क्षेत्रांची ओळख** (Identification of Vulnerable Areas):-

१. अंमली पदार्थांच्या गैरवापरास संवेदनशील असलेल्या गावांचा, शहरी भागांचा, संस्थांचा व लोकसमूहांचा नकाशा (Mapping) तयार करणे.

२. स्थानिक जोखीम घटक व आवश्यक हस्तक्षेप यांची अद्ययावत नोंद ठेवणे.

**क) मासिक तपासण्या** (Monthly Inspections):-

व्यसनमुक्ती व उपचार केंद्रे जसे DDAC, ATF, IRCA, ODIC इत्यादी.

**ड) समुदायाचे संघटन व सहभाग** (Community Mobilization):-

ग्रामपंचायती, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षक, आशा (ASHA) सेविका, अंगणवाडी सेविका, स्वयं-सहाय्यता गट (SHGs), युवक गट व स्थानिक नेते यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे.

इ) **संदर्भ व सहाय्य व्यवस्था** (Referral and Support Mechanisms):-

१. उपचार व पुनर्वसनाची आवश्यकता असलेल्या व्यक्तींना योग्य उपचार व पुनर्वसन सेवांकडे संदर्भित (Referral) करण्यासाठी आवश्यक समन्वय साधणे.

२. उपचारानंतर बरे होत असलेल्या व्यक्तींच्या पाठपुरावा (Follow-up) व समाजात पुर्नसमावेशन (Reintegration) प्रक्रियेस सहाय्य करणे.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०९०११८१६५८१३२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.09.01 18:18:39 +05'30'

**(विवेक शिंदे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबाल हिल, मुंबई-३२

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

३. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२

४. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय

५. मा. प्रधान सचिव, (सा.न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२

६. आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

७. वित्त विभाग ( व्यय-१४/अर्थ-७/ कोशा प्रशा-४ व ५)

८. महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा ) महाराष्ट्र १ / २ मुंबई / नागपूर

९. अवर सचिव (अर्थसंकल्प) तथा आहरण व संवितरण अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मंत्रालय, मुंबई
११. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१२. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
१५. निवडनस्ती (सामासू).